# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. १४ एप्रिल २०२०**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विधी समिती सभापती धर्मपाल मेश्राम यांनी केले अभिवादन

**नागपूर, ता.१४ :** भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेचे विधी समिती सभापती धर्मपाल मेश्राम यांनी अभिवादन केले. मनपा मुख्यालयामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करून त्यांनी अभिवादन केले.

विधी समिती सभापती कक्षामध्येही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला त्यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले.